२० मे २०२२

# जीएसटी परिषदेने चिंतन शिबिर घ्यावे

अॅड किशोर लुल्ला

वस्तू आणि सेवा कर परिषदेने अत्यंत तातडीने एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी जाऊन चार दिवस चिंतन शिबिर घेण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत ऑल इंडिया फेडरेशन ऑफ टॅक्स प्रॅक्टिशनर्सचे कार्यकारणी सदस्य श्री किशोर लुल्ला यांनी व्यक्त केले. गेल्या सहा महिन्यात निरनिराळ्या राज्यांच्या ऍडव्हान्स रुलिंग ऍथॉरिटी आणि उच्च न्यायालये यांनी सरकार विरोधी दिलेले निर्णय पाहता हा कायदा आणताना कसा मनमानी कारभार केला आहे हे लक्षात येते. विशेष म्हणजे चारच दिवसांपूर्वी माननीय उच्च न्यायालयाने मोहित मिनरल्स या केसमध्ये सागरी वाहतूक भाड्यावरआयतदाराकडून आयजीएसटी वसूल करता येत नाही असा निर्णय दिला. वास्तविक गुजरात उच्च न्यायालयाने हा निर्णय कंपनीच्या बाजूने दिला होता परंतु सरकारने याविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करून स्वत:वर नामुश्की ओढवून घेतली. हा निर्णय देताना माननीय उच्च न्यायालयाने एका मुद्द्याचा प्रभावीपणे उल्लेख केला आणि तो म्हणजे जीएसटी परिषदेचे निर्णय, केंद्र आणि राज्य सरकारला बंधनकारक नाहीत. जीएसटी परिषद फक्त शिफारस करू शकते. ते बंधनकारक केल्यास आर्थिक संघराज्य संकल्पनेवर विपरीत परिणाम होऊ शकतो असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना सदर शिफारसी स्वीकारण्याचाकिंवा न स्वीकारण्याचा अधिकार आहे.या निर्णयामुळे यापूर्वी भरलेल्या अशा प्रकारच्या कराचा सरकारने परतावा देणे अपेक्षित आहे.

मागच्याच महिन्यात गुजरात उच्च न्यायालयाने मुंजाल मनिशभाई भट या केसमध्ये असा निर्णय दिला की, जमीन विकसनकर्त्यांना त्यांनी विकत असलेल्या प्लॉटवर जीएसटी लावता येणारनाही. सरकारने काढलेला अध्यादेश न्यायमंचाने घटनाबाह्य ठरवला. इतकेच नाही तर यापूर्वीच्या सहा महिन्यातील असंख्य निर्णय पाहता असे लक्षात येते की वस्तू आणि सेवा कर कायद्यातील अनेक कलमे, नियम, अध्यादेश, परिपत्रके, प्रेस नोट्स आणि हे सर्व रुजू करावयाच्या कार्यपद्धती चुकीच्या, घटनाबाह्य आणि नियमबाह्य आहेत. व्यापारी आणि कर सल्लागार संघटना यांनी असंख्य वेळा शासनाकडे आणि सरकारकडे निवेदने दिली आहेत. कित्येक वेळा केंद्रीय आणि राज्य वित्त मंत्र्यांच्या समक्ष भेटीत घेतलेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने बहुतांशी निवेदनांना कचऱ्याची टोपली दाखवली जाते.

त्यामुळे माननीय न्याय मंचांच्या निर्णयामुळे, आता तरी यापुढे व्यापारी आणि कर संघटनांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन योग्य अशा तरतुदी केल्या जाव्यात. अन्यथा या कायद्याची छकले उडायला वेळ लागणार नाही आणि परत नव्याने वेगळा कायदा करावा लागेल अशी भीती श्री लुल्ला यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात व्यक्त केली आहे.